Thursday, the 16th January, 2025

RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १०, अंक ७९] सोमवार, जून २४, २०२४/आषाढ ३, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २३०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २४ जून २०२४.

अधिसूचना

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६.

क्रमांक परिनि-२०१८/प्र. क्र. १२५/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. ६) कलम ७२ चे पोट-कलम (१०) व कलम ७१ चे पोट-कलम (११) तसेच कलम ५६ चे पोट-कलम (२) (b) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) सन २०१९ चा एकरूप परिनियम क्र. ५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या परिनियमांस, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) (पहिली सुधारणा) एकरूप परिनियम, २०२४ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाच्या कामकाजाची कार्यकारी यंत्रणा) एकरूप परिनियम, २०१९ (२०१९ चा एकरूप परिनियम क्र. ५.) च्या खंड ६ मधील उप खंड (२) व (५) वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अजित बाविस्कर,
शासनाचे उप सचिव.

HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,

Mumbai 400 032, dated the 24th June 2024.

NOTIFICATION

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. Parini-2018/C.R.125/Vishi-2.—In exercise of the powers conferred by, sub-section (*10*) of section 72 read with sub-section (*11*) of section 71 and clause (b) of sub-section (*2*) of section 56 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah.VI of 2017), the Government of Maharashtra hereby amends the Maharashtra Public Universities (Functional Mechanism of Working of Students' Grievance Redressal Cell) Uniform Statute, 2019 (uniform statutes No. 5 of 2019), as follows, namely :—

1. This Statute may be called as the Maharashtra Public Universities (Functional Mechanism of Working of Students' Grievance Redressal Cell) (Amendment) Uniform Statute, 2024.

2. In clause 6 of the Maharashtra Public Universities (Functional Mechanism of Working of Students' Grievance Redressal Cell) Uniform Statute, 2019 (uniform statutes No. 5 of 2019), sub-clauses (2) and (5) shall be deleted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

AJIT BAWISKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १०, अंक १०] शुक्रवार, जुलै ५, २०२४/आषाढ १४, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ३०

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम. . . . . पृष्ठे २

दिनांक ५ जुलै २०२४ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

सतिश वाघोले,

सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ५ जुलै २०२४ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम

२०१७ चा महा. ६.

ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंचाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

१. या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे. संक्षिप्त नाव.

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०० ची सुधारणा

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम १०० मध्ये, पोट-कलम (५) मधील,—

(एक) खंड (क) मध्ये, " सार्वजनिक बांधकाम विभागाच्या " या मजकुरानंतर, " किंवा महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या " हा मजकूर जादा दाखल करण्यात येईल ;

(दोन) खंड (क) नंतर, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

" परंतु, जर महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमार्फत काम करावयाचे असेल तर, कुलपती, व्यवस्थापन परिषदेच्या पूर्व मान्यतेने, विद्यापीठाने तयार केलेल्या, महाराष्ट्र शासनाच्या किंवा भारत सरकारच्या, तीन अनुभवी व ख्यातनाम, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या नामिकेमधून अशा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची निवड करील ;".

सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ याच्या कलम १०१ ची सुधारणा

३. मुख्य अधिनियमाच्या कलम १०१ मधील,—

(१) पोट-कलम (३) मध्ये, खंड (छ) मधील, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी, राज्य शासनाकडून अंतिम मान्यता देण्याचा दिनांक वाढवण्यासाठी, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये, विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (३) चा खंड (छ) मध्ये निर्दिष्ट केलेला दिनांक हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

तक्ता

खंड	विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिनांक	२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक
(१)	(२)	(३)
(छ)	ज्या वर्षी असे नवीन महाविद्यालय किंवा परिसंस्था सुरू करण्याचे प्रस्तावित केले असेल त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी.	१५ जुलै २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी.";

(दोन) पोट-कलम (४) मधील, खंड (घ) मध्ये, दुसरे परंतुक व तक्ता याऐवजी, पुढील परंतुक व तक्ता दाखल करण्यात येईल :—

" परंतु आणखी असे की, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी राज्य शासनाकडून परवानगी देण्याचा दिनांक वाढवण्यासाठी, खाली दिलेल्या तक्त्याच्या स्तंभ (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, पोट-कलम (४) चा खंड (घ) मध्ये निर्दिष्ट केलेला दिनांक हा, उक्त तक्त्याच्या स्तंभ (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे वाचण्यात येईल :—

तक्ता

खंड	विद्यमान तरतुदीमध्ये तरतूद केलेला दिनांक	२०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी तरतूद केलेला दिनांक
(१)	(२)	(३)
(घ)	ज्या वर्षी परवानगी मागितली असेल त्या वर्षाच्या १५ जून रोजी किंवा त्यापूर्वी.	१५ जुलै २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी."

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

RNI No. MAHENG /2009/35528

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग आठ

वर्ष १०, अंक १६] शुक्रवार, जुले ५, २०२४/आषाढ १४, शके १९४६ [पृष्ठे २, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ४६

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2024 (Mah. Act No. XXVI of 2024), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SATISH WAGHOLE,

Secretary (Legislation) to Government,
Law and Judiciary Department.

MAHARASHTRA ACT No. XXVI OF 2024.

(First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on the 5th July 2024).

An Act further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016.

Mah. VI of 2017. WHEREAS it is expedient further to amend the Maharashtra Public Universities Act, 2016, for the purposes hereinafter appearing; it is hereby enacted in the Seventy-fifth Year of the Republic of India, as follows :—

1. This Act may be called the Maharashtra Public Universities (Amendment) Act, 2024. Short title.

Amendment of section 100 of Mah. VI of 2017.

2. In section 100 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (5),— Mah. VI of 2017.

(i) in clause *(a)*, after the words "the Public Works Department" the words "or the Public Sector Undertakings of the Government of Maharashtra or Government of India" shall be added;

(ii) after clause *(a)*, the following proviso shall be inserted, namely :—

"Provided that, if the work is executed through the Public Sector Undertakings of the Government of Maharashtra or Government of India, the Chancellor shall select such Public Sector Undertakings from the panel of three experienced and reputed Public Sector Undertakings of the Government of Maharashtra or Government of India, prepared by the university with prior approval of the Management Council;".

Amendment of section 109 of Mah. VI of 2017.

3. In section 109 of the principal Act,—

(i) in sub-section *(3)*, in clause *(g)*, for the second proviso and the Table, the following proviso and the Table shall be substituted, namely :—

"Provided further that, to extend the date of grant of final approval by the State Government, for the academic year 2024-2025, the date referred to in clause *(g)* of sub-section *(3)* as specified in column *(2)* of the Table given below, shall be read as provided in column *(3)* of the said Table :—

TABLE

Clause	Date provided in existing provision	Date provided for Academic Year 2024-25
(1)	*(2)*	*(3)*
(g)	on or before the 15th June of the year in which such new college or institution is proposed to be started.	on or before the 15th July 2024.";

(ii) in sub-section *(4)*, in clause *(d)*, for the second proviso and the Table, the following proviso and the Table shall be substituted, namely :—

"Provided further that, to extend the date for grant of permission by the State Government, for the academic year 2024-2025, the date referred to in clause *(d)* of sub-section *(4)* as specified in column *(2)* of the Table given below, shall be read as provided in column *(3)* of the said Table :—

TABLE

Clause	Date provided in existing provision	Date provided for Academic Year 2024-25
(1)	*(2)*	*(3)*
(d)	on or before the 15th June of the year in which permission is sought.	on or before the 15th July 2024.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE